**ठळक बातम्या**

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग

- नगरपरिषद निवडणुकीनंतर अंबरनाथमध्ये काँग्रेस आणि अकोटमध्ये एमआयएमसोबतच्या भाजपाच्या समझोत्याबद्दल मुख्यमंत्र्यांची नाराजी/ काँग्रेसच्या संबंधित नगरसेवकांचं पक्षातून निलंबन

- जीवघेण्या हल्ल्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा उपचारादरम्यान मृत्यू

आणि

- छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २६ नक्षलींचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांची आज लातूरमध्ये जाहीर सभा झाली. राज्याच्या जडण घडणीत दिवंगत विलासराव देशमुख यांनी दिलेलं योगदान अमूल्य असून आपल्याला त्यांच्याविषयी अमाप आदर असल्याचं ते म्हणाले. विलासराव देशमुख यांच्याबद्दलच्या भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या विधानाचा विपर्यास झाल्याचा दावा त्यांनी केला. लातूरला आधुनिक शहरासाठी आवश्यक नागरी सुविधा देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुण्यात शिवाजीनगर, कसबा, कोथरुड, पर्वती परिसरात रोड शो च्या माध्यमातून प्रचार करत आहेत.

शिवसेना नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज अकोल्यात प्रचारसभा होत आहे.

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपाने जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे.

कोल्हापुरात आज काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी प्रसिद्ध केला. नागरिकांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना आणि

आश्वासनांचा समावेश या जाहीरनाम्यात करण्यात आला आहे. तातडीची दहा हजार रुपयांची वैद्यकीय मदत, स्मार्ट वाहतूक आणि पार्किंगची सोय, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल, प्रभावी कचरा व्यवस्थापन, पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रण, अंबाबाई तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह “कोल्हापुरी चप्पल”ची पारंपरिक ओळख जपण्यावर भर आणि विमानतळाचं नामकरण छत्रपती राजाराम महाराज यांच्या नावावर करण्याचा प्रस्तावाचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

<><><><><>

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधे निवडणूक झाल्यानंतर भाजपाच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी एमआयएम  आणि काँग्रेसबरोबर स्थानिक पातळीवर समझोता केल्याबद्दल भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यात सहभागी झालेल्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथल्या नगरपरिषदेत शिवसेनेला डावलून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर अंबरनाथ विकास आघाडी भाजपानं तयार केली आहे तसंच अकोला जिल्ह्यात अकोट इथं एमआयएम बरोबर समझोता केला आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत हे समझोते खपवून घेणार नाही असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.

भाजपाच्या स्थानिक नेत्यांचा हा निर्णय चुकीचा असल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली आहे. याबाबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी उत्तर दिलं पाहिजे अशी मागणी त्यांनी नाशिकमधे प्रचार रॅलीनंतर वार्ताहरांशी बोलताना केली. शिंदे यांनी नाशिकमधे शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठी रोड शो केला.

दरम्यान, काँग्रेसनं अंबरनाथमधल्या पक्षाच्या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केलं आहे. कार्यकारिणी बरखास्त करण्याचा तसंच कार्यकारिणीच्या अध्यक्षांना निलंबित करण्याचा आदेश प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. भाजपासोबतची युती ही चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे.

<><><><><>

निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज असून, खबरदारी म्हणून अनेक उपाय केले जात आहे. जालना महानगरपालिका क्षेत्रात परवानाधारकांकडे असलेली शस्त्रं निवडणूक काळात परत मागवण्यात आली आहेत.

आचारसंहिता लागू झाल्यापासून ते आतापर्यंत एकूण २४५ पैकी २१४ शस्त्रे, परवानाधारकांनी विविध पोलिस ठाण्यात जमा केली आहे. ही शस्त्रे त्यांना निवडणूक संपल्यानंतर परत मिळणार असल्याचं, मनपा कार्यालयाकडून कळवण्यात आलं आहे.

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचं प्रमाण वाढायला हवं, या उद्देशानं धुळे शहरात आज महापालिकेतर्फे मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी अहिराणी भाषेत घोषणा देऊन मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली.

चंद्रपूर शहरातही आज मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी वीस टक्के कर्मचारी प्रशिक्षण सत्राला गैरहजर राहिल्यानं त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त असलेल्या ४ हजार कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत प्रशिक्षण घेतलं असून यापैकी ७८२ जण गैरहजर राहिल्याचं महानगरपालिकेच्या प्रवक्त्यानं सांगितलं. महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी गैरहजर राहिलेल्या कर्मचाऱ्यांना कठोर शब्दात समज दिली आहे.

**<><><><><>**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने तयार केलेल्या प्रचारगीताला निवडणूक आयोगानं परवानगी नाकारली आहे. या गीतात ‘भगवा’ या शब्दाचा उपयोग करण्यात आला होता. धार्मिक प्रतीकांचा राजकीय प्रचारात वापर करण्यास आचारसंहितेनुसार बंदी आहे, त्यामुळे हा शब्दप्रयोग नियमांच्या विरोधात असल्याचं आयोगानं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी विकसित भारत जीरामजी योजना केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत आहे. या योजनेविषयी धाराशिव जिल्ह्यातले रहिवासी केशव गुरव यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया दिली.

**- -होल्ड - बाईट - केशव गुरव - -**

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर काल झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अकोला जिल्ह्यात अकोट तालुक्यात मोहाळा या  गावात मशिदीत नमाज अदा करुन बाहेर पडणाऱ्या हिदायत पटेलांवर हल्लेखोराने धारदार शस्त्राने हल्ला केला. पटेल यांना तातडीनं रुग्णालयात नेलं, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. नंतर फरार झालेल्या हल्लेखोराला जवळच्या पणज गावात गावकऱ्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. राजकीय आणि कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याचा आरोप  हिदायत पटेल यांच्या कुटुंबियांनी केला आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २६ नक्षलींनी आत्मसमर्पण केलं. यातल्या १३ जणांवर एकूण ६५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. छत्तीसगडच्या पुनर्वसन योजने अंतर्गत या नक्षलींनी पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करल्याचं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. हे नक्षली पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचे सदस्य होते, ओदिशा आणि आंध्रप्रदेशातल्या अनेक कारवायांमधे त्यांना सहभाग होता. या सर्वांना प्रत्येकी ५० हजार रुपये तसंच पुनर्वसन धोरणानुसार मदत दिली जाईल, असं चव्हाण यांनी सांगितलं. छत्तीसगडच्या धमतारी जिल्ह्यात कालही एका नक्षली महिलेनं आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><>**

घरात रोख रक्कम सापडल्याने वादग्रस्त ठरलेले अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करायच्या लोकसभा सभापतींच्या निर्णयाला न्यायमूर्ती वर्मा यांनी आज सर्वोच्च न्यायालयात विरोध केला. आपल्याविरुद्ध महाभियोगाचा प्रस्ताव जर लोकसभा आणि राज्यसभेत एकाच दिवशी मांडला, तर या दोन्ही सदनांनी संयुक्तरीत्या चौकशी समिती स्थापन करायला हवी, असा युक्तिवाद न्यायमूर्ती वर्मा यांचे वकील मुकुल रोहतगी यांनी केला. महाभियोग प्रस्ताव राज्यसभेने रद्द केला आणि लोकसभेच्या सभापतींनी समिती स्थापन केली, हे कायद्याला धरून नाही, असं रोहतगी यांनी, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या पीठाला सांगितलं.

**<><><><><>**

भारताची अग्रमानांकित बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं मलेशिया खुल्या सुपर 1000 स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत सिंधूनं चायनीज तैपेईच्या सुंग शुओ युन हिचा २१-१३,२२-२० असा पराभव केला.

दुसऱ्या फेरीत सिंधूची लढत जपानच्या टोमोका मियाझाकी हिच्याशी होणार आहे. सिंधूच्या पायाला गेल्यावर्षी दुखापत झाली होती. त्यातून बरे झाल्यानंतर पहिल्यांदाच सिंधू आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाली आहे.मालविका बनसोडला मात्र पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला.

पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेननं सिंगापूरच्या खेळाडुला २१–१६, १५–२१, २१–१४ असं हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात कोरची तालुक्यात हितकसा इथे एका आवारात अवैध लागवड केलेला तब्बल १५ लाख रुपयांचा गांजा स्थानिक पोलिसांच्या गुन्हे शाखेनं जप्त केला.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या कौसा इथं छापा टाकून पोलिसांनी सुमारे साडे चौदा लाख रुपयांचा मेफेड्रोन हा अमली पदार्थ पकडला. याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आलं असून तो मुंब्र्याचा रहिवासी असल्याचं समजतं.

**//<><><><><>//**